**दिनांक** 28/04/2025

# उमेदवारांसाठी प्राधान्यक्रमाबाबत सर्वसाधारण सूचना

(TAIT 2022 - **दुसरा टप्पा**)

**शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी २०२२ (दुसरा टप्पा) नुसार पवित्र पोर्टलमार्फत शिक्षक पदभरतीसाठीच्या रिक्त जागांसाठी प्राधान्यक्रम जनरेट व लॉक करण्याबाबत**

1. दिनांक 24/04/2025 रोजी देण्यात आलेल्या सूचनांनुसार उमेदवारांना प्राधान्यक्रम Generate करण्याची व Lock करण्याची सुविधा दिनांक 25/04/2025 ते दिनांक 2/05/2025 या कालावधीत उपलब्ध करून देण्यात आलेली आहे .

2. प्राधान्यक्रम Generate करणे, Lock करणे इत्यादीबाबत काही तांत्रिक अडचणी उद्भवल्यास उमेदवारांना edupavitra2022@gmail.com या ई-मेल वर संपर्क साधता येईल, असेही सुचवण्यात आले आहे. त्यानुसार उमेदवारांकडून प्राधान्यक्रमाबाबत येणाऱ्या अडचणींबाबतचे ई .प्राप्त होत आहेत मेल-
3. उमेदवारांच्या अडचणींचे खालीलप्रमाणे निराकरण करण्यात येत आहे.
   (अ) ज्या उमेदावारांना OTP मिळण्यात अडचणी येत आहेत, अशा उमेदवारांनी ते वापरत असलेल्या Browser ची History / Cache Clear करावी. त्यानंतरही समस्येचे निवारण न झाल्यास Incognito window (Private Window) चा वापर करावा.

   (आ) पवित्र पोर्टलवर प्रसिद्ध झालेल्या जाहिरातीमध्ये रिक्त असलेले पद, इयत्तांचा गट (उदाहरणार्थ, इयत्ता १ ते ५, ६ ते ८, ९ ते १०, ११ ते १२ व डी. एड कॉलेज शिक्षक) अध्यापनाचे विषय, अध्यापनाचे माध्यम, आरक्षण (समांतर आरक्षणासह) इत्यादी बाबी एकत्रितपणे विचारात घेऊन उमेदवारांना प्राधान्यक्रम जनरेट होत आहेत. उमेदवारांनी पवित्र पोर्टलच्या होम पेजवरील डाउनलोड मेन्यूअंतर्गत प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहिरातींचे अवलोकन करावे. त्यामधील आरक्षण व विषय यांसह वरील सर्व बाबींचा एकत्रित विचार करून आपण पात्र असूनही काही तांत्रिक बाबीमुळे प्राधान्यक्रम जनरेट होत नसल्यास, उमेदवारांनी यापूर्वी जनरेट केलेले प्राधान्यक्रम Delete करून नव्याने प्राधान्यक्रम

जनरेट करावेत. जनरेट केलेले प्राधान्यक्रम Delete करून नव्याने प्राधान्यक्रम जनरेट करण्यासाठी संधींची मर्यादा असणार नाही.

**(इ)** यानंतरही प्राधान्यक्रम Generate करणे, Lock करणे इत्यादीबाबत काही तांत्रिक अडचणी उद्भवल्यास उमेदवारांना आपला TAIT ID, नाव, जातसंवर्ग, जन्मदिनांक तसेच समस्या येत असलेल्या जाहिरातीचा तपशील नमूद करून edupavitra2022@gmail.com या ई-मेल वर संपर्क साधता येईल.

**---000---**